# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.05.2025** **वारःमंगळवार**

1. देशभरात येत्या 29 तारखेपासून विकसित कृषी संकल्प अभियान सुरु करण्याची केंद्रीय कृषीमंत्र्यांची माहिती
2. कृषी कर्जासाठी शेतकऱ्यांना पतगुणांकनाची अट न घालता कर्जपुरवठा करा, मुख्यमंत्र्यांचे बँकांना सूचना
3. पावसामुळे झालेल्या पिक नुकसानीचे पंचनामे करून, अहवाल सादर करण्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा आदेश आणि
4. मुंबई-गोवा महामार्गावर झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू

**<u>कृषी संकल्प अभियान</u>**

शेतकऱ्यांना कृषीविषयक आधुनिक तंत्रज्ञान आणि बियाण्यांची माहिती देण्यासाठी येत्या 29 मे पासून देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियान सुरू करण्यात येणार आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. देशातल्या 723 जिल्ह्यांमधे ही मोहीम राबवण्यात येणार असून, सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवण्याचं उद्दिष्ट आहे. एकंदर 65 हजार गावात जाऊन वैज्ञानिकांचं पथक शेतकऱ्यांना यासंदर्भात प्रात्यक्षिकं आणि प्रशिक्षण देईल. जिल्हा पातळीवर या पथकाच्या दररोज तीन बैठका होतील असं त्यांनी सांगितलं. या अभियानात 2 हजार 170 पथकं तयार करण्यात येणार असून प्रत्येक पथकात किमान 4 शास्त्रज्ञांचा समावेश असेल.

**<u>मुख्यमंत्री-बँकर्स समिती</u>**

कृषी कर्जासाठी शेतकऱ्यांना सिबिलची अट न घालता कर्जपुरवठा करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बँकांना दिले. राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या 167 व्या बैठकीत ते काल मुंबईत बोलत होते. शेतकऱ्यांना कृषी कर्जाचा पुरवठा झाला नाही, तर त्याचा दुष्परिणाम अर्थव्यवस्थेबरोबरच शेतकऱ्यानाही होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना सीबिल मागू नका, असं फडणवीस यांनी सांगितलं. जर एखादी बँक शाखा सिबिल मागत असेल तर त्या शाखेवर कारवाई करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घ्यावा, अशा स्पष्ट शब्दात मुख्यमंत्र्यांनी बँकांना तंबी दिली. कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी विशेष प्रयत्न करून यंदा दिलेलं उद्दिष्ट पूर्ण करावं, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी राज्याचा 2025-26 या वित्तीय वर्षाचा 44 लाख 76 हजार 804 कोटी रुपयांचा पतपुरवठा आराखडा मंजूर करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.

**<u>कोकाटे-नाशिक</u>**

गेल्या काही दिवसात राज्याच्या विविध भागात झालेल्या पावसामुळे राज्यभरात 27 हजार हेक्टर पिकांचं नुकसान झालं आहे. यासंदर्भात लवकरच पंचनामे करून त्याचा अहवाल सादर करण्याचे आदेश कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी अधिकाऱ्यांना दिले. नाशिकमध्ये आयोजित खरीपपूर्व हंगाम बैठकीनंतर काल त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. खरिप हंगामात खतं कमी पडणार नाहीत याची काळजी घेतली जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>पंतप्रधान-मन की बात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 25 मे रोजी आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमात देश-परदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 122वा भाग आहे. या कार्यक्रमासाठी नागरिकांना आपल्या प्रतिक्रिया आणि सूचना

1800-11-7800 या टोल-फ्री क्रमांकावर किंवा नरेंद्र मोदी ॲप आणि मायगव्ह ओपन फोरमवर ऑनलाइन नोंदवता येतील. या सूचना 23 तारखेपर्यंत स्वीकारल्या जाणार आहेत.

**छगन भुजबळ**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश होणार आहे. आज सकाळी त्यांचा शपथविधी होईल. त्यांना अन्न आणि नागरी पुरवठा खात्याचं मंत्रिपद मिळण्याची शक्यता असल्याचं या संदर्भातील वृत्तात म्हटलं आहे.

**ऑपरेशन सिंदूर**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ, भारतीय सैन्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी देशभरात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. राज्यात काल पनवेल, ठाणे, धुळे, शिरपूर, भुसावळ, पुसद इथं तिरंगा यात्रा काढण्यात आल्या. लातूर जिल्ह्यात काढण्यात आलेल्या तिरंगा यात्रेत माजी सैनिकांसह नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. ऑपरेशन सिंदूर बद्दल बोलताना लातूर मधले निवृत्त सैन्य अधिकारी कर्नल गिरीधर कोले म्हणाले......

**मुख्यमंत्री-नागपूर**

देशाला सिकलसेल आणि थॅलेसेमिया या दुर्धर आजाराच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी नागपूरच्या शासकीय महाविद्यालयात दर्जेदार उपचार सुविधांच्या निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर मध्ये दिली. नागपूरच्या शासकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात 70 कोटी खर्चाच्या विविध सुविधा आणि विकास कामांचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात मेगा डायलिसिस सेंटर आणि रुग्णवाहिकांचे लोकार्पण करण्यात आलं.

**पवार**

श्री क्षेत्र परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असून संबंधित कामं दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण झाली पाहिजेत असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. त्यांनी काल परळी वैजनाथ इथं श्री वैजनाथाचं दर्शन घेतलं. मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकास आराखड्यातील कामांची पाहणी त्यांनी केली. त्यानंतर झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी परळी औष्णिक विद्युत केंद्राअंतर्गत सुरू असलेल्या कामाचा आढावा त्यांनी घेतला. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आदी यावेळी उपस्थित होते.

**आरोग्य धोरण**

सार्वजनिक आरोग्य विभाग अधिक गतिमान, लोकाभिमुख आणि पारदर्शी करण्यासाठी राज्याच्या आरोग्य धोरणाबाबतचा प्रस्ताव तातडीनं सादर करण्याचे निर्देश आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी काल दिले. या संदर्भातल्या उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत असलेल्या, कंत्राटी कर्मचाऱ्यांचा शासन सेवेत समावेश करून त्यांच्या मानधन वाढीचा प्रस्ताव लवकर सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदली प्रक्रियेमध्ये पारदर्शीपणा असावा तसंच आदिवासी आणि दुर्गम भागात काम करणाऱ्या डॉक्टरांना विशेष सुविधा देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा असंही त्यांनी सांगितलं.

**केळकर संग्रहालय**

जागतिक संग्रहालय दिनाच्या निमित्ताने पुण्यातल्या राजा दिनकर केळकर संग्रहालयात स्मार्ट डिजिटल ऑडिओ गाईड सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. संग्रहालयाच्या विविध दालनांमध्ये असणाऱ्या दुर्मिळ वस्तूंची माहिती पर्यटकांना मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेमध्ये डिजिटल ऑडिओ गाईडच्या माध्यमातून मिळणार आहे. पर्सिस्टंट फाउंडेशन ग्रोलायटेल डिजिटल च्या साह्याने ही स्मार्ट डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.ऐकू या याविषयी अधिक माहिती संग्रहालयांचे व्यवस्थापक सुधन्वा रानडे यांच्या कडून.....

**अकरावी प्रवेश वेळापत्रक**

महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागानं शैक्षणिक वर्ष 2025-26 या वर्षासाठी अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्याचा सराव करण्यासाठी, नोंदणी आणि महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरण्याची संधी मिळेल. आज, 20 मे रोजी मध्यरात्री 12 वाजेपर्यंत हे सराव अर्ज उपलब्ध असतील. प्रवेशासाठी अंतिम अर्ज 21 मे ते 28 मे या कालावधीत भरता येतील. अंतिम गुणवत्ता यादी तीन जून रोजी प्रसिद्ध केली जाईल, अशी माहिती मंडळांनं दिली आहे.

**अपघात**

मुंबई-गोवा महामार्गावर काल झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. मुंबईहून देवरुखला जाणारी कार चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे रत्नागिरीजवळ जगबुडी नदीत कोसळून हा अपघात झाला.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत सनरायझर्स हैद्राबाद संघानं कालच्या सामन्यात लखनौ संघावर सहा गडी राखून विजय मिळवला. लखनौ सुपर जायंटस संघ प्लेऑफ्सच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. 206 धावांचं लक्ष सनरायझर्स हैदराबादने 18 षटकं 2 चेंडूत चार गडी गमावून पार केलं. अभिषेक शर्माला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं.

**हवामान**

राज्यात काल कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. येत्या 25 मे पर्यंत राज्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**